22-04-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 21-04-2025 21:19 Page 1



## निवडक

### साळ येथील विठ्ठलाई देवस्थानचा उद्या वर्धापनदिन

■ टीम दैनिक हेराल्ड

**साळ, दि. २१** : मधलावाडा येथील श्री विठ्ठलाई देवस्थान चा वर्धापनदिन विविध कार्यक्रमांनीशी बुधवार दि. २३ रोजी साजरा करण्यात येणार आहे. बुधवारी सकाळी श्रीची पूजा, लघुरुद्र व अभिषेक झाल्यानंतर विदेश न्हानू घुरे यांच्या यजमानाखाली सकाळी ११ वाजता श्री सत्यनारायण महापूजा, पुराण वाचन, आरती व तीर्थप्रसाद झाल्यानंतर दुपारी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तसेच संध्याकाळी भजनी कलाकारांचे सुश्राव्य भजन सादर करण्यात येणार आहे व रात्री १० वाजता नाईक मोचेमाडकर दशावतारी नाट्य मंडळ – वेंगुर्ला यांचा बहारदार दशावतारी नाट्यप्रयोग सादर होणार आहे.

तसेच गुरुवार दि. २४ रोजी रात्री १० वाजता लोकराजा सुधीर कलिंगण प्रस्तुत श्री कलेश्वर दशावतार नाट्य मंडळ – नेरुर सावंतवाडी यांचा ट्रिक सीन युक्त नाट्य प्रयोग जय जय रवळनाथ हा नाट्यप्रयोग सादर करणार आहेत. या नाट्यप्रयोगात युवाराजा सिद्धेश कलिंगण हे श्री देव रवळनाथ या प्रमुख भूमिकेसह वेगवेगळ्या चार भूमिका वठवणार आहेत. तरी सर्व भाविकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आयोजकामार्फत देवस्थान मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष शांबा घुरे यांनी प्रसिद्ध केले आहे.

---

### करमळी भागात आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१** : ११ केव्ही करमळी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २२ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत एला फार्म, विनित व्हिजन, सीजे फर्नांडिस, काटेभाट, जय भवन आणि जुने गोवेतील काटेभाट भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे ११ केव्ही जुने गोवा फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २३ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत एडमार पिंटो गॅरेज, गोवा बाजार, मन्नत, आयसीएआर कॉलनी, दोतोर भाट, पेरीभाट, एसएफएक्स–१,२,३, एसएफएक्स इमारत जुने गोवा आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### फोंडा भागात आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २१** : फोंडा साईराज १/२ फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २२ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत साईराज पार्क आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे आयडी हॉस्पिटल फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २३ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत आयडी हॉस्पिटल गोवा आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

---

### फोंडा रवीनगर भागात आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**फोंडा, दि. २१** : फोंडा रवी नगर फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत रवीनगर खडपाबांध आणि सभोवतालच्या भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे फ्रॅड्स कॉलनी खडपाबांध गार्डन–१ फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने गुरुवार दि. २४ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत फ्रॅड्स कॉलनी खडपाबांध आणि सभोवतालच्या भागात वीजपूरवठा केला जाणार नाही.

---

### कुडतरी भागात आज खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१** : कुडतरी येथील रायतोले डीटीसी आणि पांडिकॉल फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने मंगळवार दि. २२ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत रायतोले, सेंडुल, कंबोर्ड, पांडिकॉल, आरगिकल आणि आवोर्टे भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

त्याचप्रमाणे बतोरा डीटीसी कुडतरी फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने २३ रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेपर्यंत बतोरा भागात वीजपूरवठा केला जाणार नाही.

---

### चांदोन फिडरवर उद्या खंडित वीजपुरवठा

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१** : ११ केव्ही चांदोर फिडरवर तांतडीचे दुरूस्ती काम करावयाचे असल्याने बुधवार दि. २३ रोजी सकाळी ८ ते दुपारी २ वाजेपर्यंत गिरडोली, मशरूम गार्डन, बचर, रोहिणीभाट, मोल आणि नोव्हेटे भागात वीज पूरवठा केला जाणार नाही.

# पोप फ्रान्सिस यांच्या निधनानंतर देशभरात नऊ दिवसांचा शोक

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१** : पोप फ्रान्सिस यांच्या निधनानंतर कॉन्फरन्स ऑफ कॅथोलिक बिशप्स ऑफ इंडिया (सीसीबीआय) ने देशभरात नऊ दिवसांचा शोक पाळण्याचे आवाहन केले आहे. या संदर्भातील अधिकृत परिपत्रक आज जारी करण्यात आले असून, गोवा व दमणचे आर्चबिशप तसेच सीसीबीआयचे अध्यक्ष कार्डिनल फिलिप नेरी फेराओ यांनी हे निवेदन सादर केले.

या शोकपरिपत्रकात भारतातील सर्व आर्चबिशप, बिशप, पुजारी, डिकन, धार्मिक, धर्मोपदेशक तसेच लॅटिन कॅथोलिक चर्चच्या सामान्य विश्वासूंना उद्देशून आवाहन करण्यात आले आहे की, पोप फ्रान्सिस यांच्या स्मृतीप्रित्यर्थ प्रार्थना व श्रद्धांजली अर्पण करावी. पोप फ्रान्सिस यांना देवाच्या लोकांचे खरे मेंढपाळ असे संबोधत, कार्डिनल फेराओ यांनी त्यांचे जीवन सुवार्तेच्या प्रसारासाठी, गरीब व उपेक्षितांच्या सेवेसाठी आणि जगात करुणा, न्याय व सृष्टीच्या रक्षणाचे संदेश देण्यासाठी समर्पित असल्याचे नमूद केले.

शोकाच्या चिन्हार्थ चर्चच्या घंटा वाजवण्याची सूचना देण्यात आली असून, या काळात विशेष प्रार्थनांचे आयोजन करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. कार्डिनल फेराओ यांच्या निवेदनात २०१३ ते २०२५ या काळात पोप फ्रान्सिस यांनी चर्चला शहाणपणा, नम्रता व समावेशकतेच्या मार्गाने मार्गदर्शन केल्याचे अधोरेखित करण्यात आले आहे. त्यांच्या नेतृत्वात चर्चने सहकार्यावर आधारित समुदायाचा आदर्श मांडला, जो ऐकतो, ओळखतो, सहप्रवास करतो आणि सर्वांचा समावेश करतो. विशेषतः स्थलांतरित, निर्वासित आणि समाजाच्या कडेला राहणाऱ्या लोकांप्रती पोप यांची असलेली खोल करुणा जगभरात आदराने पाहिली गेली.

आंतरधार्मिक संवादासाठी पोप फ्रान्सिस यांचे योगदान उल्लेखनीय असल्याचे म्हणत, पर्यावरणीय विश्वकोश 'लौडातो सी' च्या माध्यमातून त्यांनी पृथ्वी मातेच्या रक्षणासाठी जागतिक चळवळ सुरू केल्याचेही नमूद करण्यात आले आहे.



पोप फ्रान्सिस यांचे भारताबाबत विशेष प्रेम होते आणि त्यांनी आपल्या भूमीला भेट देण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली होती, असेही या परिपत्रकात स्पष्ट करण्यात आले आहे. जानेवारी २०२५ मध्ये भुवनेश्वर येथे झालेल्या सीसीबीआय च्या ३६व्या पूर्ण अधिवेशनादरम्यान त्यांनी भारतीय बिशपांना पाठवलेल्या संदेशात गरीब व असुरक्षित लोकांना प्राधान्य देणे आणि चर्चचे दरवाजे सर्वांसाठी खुले ठेवणे यावर भर दिला होता.

सर्व डायोसिस आणि प्रांतांमध्ये स्थानिक परिस्थितीनुसार योग्य दिवशी स्मृतिपूर्वक रिक्विम मासेस (शोकविधी) आयोजित करावेत, अशी विनंती कार्डिनल फेराओ यांनी केली आहे. या प्रार्थना सभांमध्ये पुजारी, धार्मिक व्यक्ती आणि सामान्य विश्वासू यांनी एकत्र येऊन दिवंगत पवित्र पित्याच्या चिरशांतीसाठी सामूहिक प्रार्थना करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.निवेदनाच्या शेवटी, कार्डिनल फेराओ म्हणतात, आपल्या दयाळू प्रभु पोप फ्रान्सिस यांना चिरंतन विश्रांती देवो. धन्य व्हर्जिन मेरीच्या मातृ मध्यस्थीद्वारे या कठीण काळात चर्चला बळकटी लाभो.

### अशी केली जाते नवीन पोपची निवड

पोपची निवड पारंपरिकरीत्या कार्डिनल्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ज्येष्ठ धर्मगुरूंकडून केली जाते.ही प्रक्रिया अत्यंत गोपनीय असते. पोप यांची निवड करण्यासाठी मध्ययुगीन काळापासून हीच प्रक्रिया चालत आली आहे.

जेव्हा नवीन पोप निवडण्याची गरज असते, तेव्हा सर्व कार्डिनल्सना रोममधील व्हॅटिकनमध्ये पेपल कॉन्क्लेवसाठी (पोप परिषद) बोलावले जाते. ही एक निवडणूक प्रक्रिया आहे, जी सुमारे ८०० वर्षांपासून चालत आलेली आहे. यात आतापर्यंत कोणताच बदल झालेला नाही.कॉन्क्लेवच्या पहिल्या दिवशी, ते सेंट पीटर्स बॅसिलिकामध्ये मास (एक ख्रिश्चन उपासना) आयोजित करतात. त्यानंतर ते व्हॅटिकनच्या सिस्टिन चॅपलमध्ये एकत्र जमतात. तिथे, 'एक्स्ट्रा ऑम्मेस' (लॅटिन भाषेनुसार 'प्रत्येकजण बाहेर') असा आदेश दिला जातो.त्यानंतर, नवीन पोप निवडले जाईपर्यंत सर्व कार्डिनल्स यांना व्हॅटिकनमध्येच थांबवलं जातं.कार्डिनल इलेक्टर्सला (मुख्य मतदार) कॉन्क्लेव्हच्या पहिल्या दिवशी सिस्टिन चॅपलमध्ये सुरुवातीचे मत देण्याचा पर्याय असतो. दुसऱ्या दिवशीपासून ते दररोज सकाळी दोन आणि दुपारी दोन मतदान करतात. जोपर्यंत पोप पदासाठीचे उमेदवार एकापर्यंत खाली जात नाही तोपर्यंत ही प्रक्रिया चालते.मतदानात, प्रत्येक कार्डिनल इलेक्टर आपल्या पसंतीच्या उमेदवाराचे नाव मतदान पत्रावर 'एलिजिओ इन समम पोंटिफिसम' या शब्दांच्या खाली लिहितो, त्याचा अर्थ मी सर्वोच्च पोंटिफ म्हणून निवडतो असा आहे. मतदान गुप्त राखण्यासाठी, कार्डिनल्सना त्यांच्या सामान्य हस्ताक्षर शैलीचा वापर न करण्याची सूचना दिली जाते.दुसऱ्या दिवशी मतदानात निर्णायक निकाल लागला नाही, तर तिसरा दिवस प्रार्थना आणि चिंतनासाठी राखीव ठेवला जातो.त्या दिवशी कोणतेही मतदान घेतले जात नाही. त्यानंतर पुन्हा मतदानाला सुरुवात होते.पोप म्हणून निवडून येण्यासाठी एका उमेदवाराला कार्डिनल इलेक्टर्सच्या (मुख्य मतदार) दोन –तृतीयांश मतांची आवश्यकता असते.या प्रक्रियेस काही दिवस किंवा कधी कधी काही आठवडेही लागू शकतात.

# 'हाऊजी' खेळावर बंदीऐवजी नियमन हवे

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१** : गोव्यातील लोकप्रिय पारंपरिक खेळ 'हाऊजी' यावर बंदी घालण्याऐवजी त्याचे नियमन करावे, अशी विनंती गोवा बॅडमिंटन असोसिएशनचे माजी सचिव आणि क्रीडा प्रवर्तक संदीप हेबळे यांनी राज्य सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्राद्वारे केली आहे. दक्षिण गोवा जिल्हाधिकाऱ्यांनी गोवा सार्वजनिक जुगार प्रतिबंधक कायद्यांतर्गत 'हौसी'सह तत्सम खेळांवर कारवाई करण्याचे आदेश दिल्यानंतर हेबळे यांनी हा प्रस्ताव सादर केला. या आदेशामुळे नागरिकांच्या काही गटांत नाराजी आणि असंतोष निर्माण झाला आहे.

हेबळे यांनी मुख्यमंत्री, क्रीडा मंत्री, पर्यटन मंत्री, सचिव (क्रीडा), क्रीडा आणि युवा व्यवहार संचालनालयाचे संचालक, गोवा क्रीडा प्राधिकरणाचे कार्यकारी संचालक तसेच गोवा ऑलिंपिक असोसिएशनचे अध्यक्ष आणि सचिव यांना संबोधित करून आपले पत्र पाठवले आहे.

गोव्याच्या संस्कृतीत खोलवर रुजलेला हा खेळ चैतन्यशील, नियंत्रित चळवळीत परिवर्तित होऊ शकतो, असे त्यांनी पत्रात नमूद करत गोवा हाऊजी असोसिएशन किंवा गोवा बोर्ड गेम्स फेडरेशन स्थापन करण्याची शिफारस केली. अशा संस्थेमार्फत स्थानिक क्लबची नोंदणी, मार्गदर्शक तत्त्वांची आखणी, अधिकृत परवाने आणि जबाबदारीने कार्यक्रमांचे आयोजन शक्य होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

'हाऊजी ' हा पारंपरिक खेळ वाढदिवस, विवाह, कौटुंबिक समारंभ, चर्च फेअर्स, टायटर्स' आणि विविध सामाजिक उपक्रमांमधून खेळला जातो आणि तो समुदायांना एकत्र आणतो, असे हेबळे म्हणाले. केवळ एक कॉलर, एक बोर्ड आणि काही भाग्यवान क्रमांक पुरेसे असतात . आणि हा खेळ एकत्रिततेचे माध्यम बनतो, असे त्यांनी लिहिले.

दक्षिण गोवा जिल्ह्यातील बंदीनंतर हा मुद्दा चर्चेत आला होता. याच पार्श्वभूमीवर गोवा फुटबॉल असोसिएशनचे अध्यक्ष कैतानो फर्नांडिस यांनी

### संदीप हेबळे यांची राज्य सरकारकडे मागणी

मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन हौसी खेळाची सामाजिक आणि क्रीडा संदर्भातील उपयुक्तता अधोरेखित केली होती. हा लॉटरीसारखा जुगार नाही, तर हा एक स्नेहवर्धक पारंपरिक खेळ आहे जो समाज बांधणीला हातभार लावतो, असे हेबळे यांनी पत्रात स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, गोव्यात 'हाऊजी 'सह लुडो, मोनोपॉली, सापशिडी यांसारखे पारंपरिक खेळ एकत्रित करून राष्ट्रीय फेडरेशन उभारता येऊ शकते. गोव्यात पर्यटन, हॉटेल व्यवसाय आणि क्रीडा क्षेत्राशी संलग्न असलेले अनेक अनुभवी प्रशासक आहेत, असे नमूद करत त्यांनी व्हेरो नूनेस, गुडुदत्त भक्ता, मॅक वाझ, निशा माडगावकर, एल्विस गोम्स, गौरीश धोंड आणि राजेश खंवटे यांची नावे सुचवली, जे या उपक्रमासाठी मार्गदर्शक ठरू शकतात. हेबळे यांनी बोर्ड गेम्सचे आयोजन संगीत व सांस्कृतिक कार्यक्रमांशी संलग्न करून स्थानिक कलाकार, आणि संगीतकारांसाठी प्लॅटफॉर्म निर्माण करण्याचे सुचवले. या माध्यमातून स्थानिकांना रोजगारही उपलब्ध होऊ शकेल.

पर्यटन विभागाच्या दृष्टीने कौटुंबिक, सुरक्षित आणि वैशिष्ट्यपूर्ण अनुभव महत्त्वाचे मानले जात असताना, हेबळे यांनी गोवा 'हाऊजी 'फेस्टिव्हल', 'बोर्ड गेम्स महोत्सव', 'पतंग महोत्सव' किंवा 'काजू महोत्सव' यांसारख्या उपक्रमांचे आयोजन इफफी च्या धर्तीवर करण्याची शिफारस केली. २०२६ मध्ये 'राष्ट्रीय बोर्ड गेम्स फेस्टिव्हल' तसेच भविष्यात 'आंतरराष्ट्रीय बोर्ड गेम्स फेस्टिव्हल' गोव्यात आयोजित करण्याची कल्पनाही त्यांनी मांडली. हा उपक्रम 'खेलो इंडिया बोर्ड गेम्स' अंतर्गत आणता येईल, असे सांगत त्यांनी गोव्याच्या सांस्कृतिक ओळखीचे प्रतिनिधित्व करणारा शुभंकर उदाहरणार्थ बुलबुल किंवा किंगफिशर तयार करण्याचा प्रस्ताव मांडला.

# काजू उत्पादनाला लवकरच अच्छे दिन येणार

**जीएफडीसी यंदा २८० हेक्टर क्षेत्राचे पुनरुज्जीवन करणार : देविया राणे यांची महिती**

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१** : गोवा वन विकास महामंडळ (जीएफडीसी) यावर्षी २८० हेक्टर काजू लागवडीच्या क्षेत्राचे पुनरुज्जीवन करणार असून, पुढील दोन वर्षांत आणखी १,५०० हेक्टर क्षेत्र विस्तारण्याचे लक्ष्य ठेवले आहे, अशी माहिती महामंडळाच्या अध्यक्षा देविया राणे यांनी दिली.

राज्यातील काजू उत्पादनातील सातत्याने होणाऱ्या घटीचा विचार करता, ही पुनरुज्जीवन मोहीम राबवली जात असल्याचे राणे यांनी स्पष्ट केले. सध्या गोव्यात काजूचे सरासरी उत्पादन प्रति हेक्टर केवळ ४३० किलो असून, ती राष्ट्रीय सरासरी ७५० किलो प्रति हेक्टरच्या तुलनेत खूपच कमी आहे. गोव्यातील काजू चव व आकाराच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण आहे. मात्र, पारंपरिक शेतीत झालेली घट, तांत्रिक ज्ञानाचा अभाव आणि योग्य व्यवस्थापनाचा अभाव यामुळे या क्षेत्रात मागासलेपणा जाणवतो. आपण याकडे लक्ष दिले नाही तर काजूचा पारंपरिक वारसा गमावण्याची शक्यता आहे, असे राणे म्हणाल्या.

जीएफडीसी च्या अखत्यारीतील एकूण ६,५०० हेक्टर काजू लागवडीपैकी मोठ्या प्रमाणात क्षेत्र हे अनेक वर्षांपासून दुर्लक्षित होते. महामंडळाने २०२१ मध्ये ७० हेक्टर क्षेत्रापासून पुनरुज्जीवन कार्यक्रमाला सुरुवात केली. आतापर्यंत एकूण ४५० हेक्टर क्षेत्राचे पुनरुज्जीवन झाले असून, यावर्षी आणखी २८० हेक्टर क्षेत्र त्यात जोडले जाणार आहे.



जीएफडीसीतर्फे २५ ते २७ एप्रिलदरम्यान आयोजित करण्यात आलेला 'काजू महोत्सव' हा या क्षेत्राला नवे बळ देण्याच्या व्यापक प्रयत्नांचा भाग आहे. हा महोत्सव म्हणजे शेतापासून बाटलीपर्यंतचा काजूचा प्रवास उलगडणारा अनुभव आहे. यामध्ये शेतकरी, स्वयंसहायता गट, फेणी भट्ट्यांवरील कामगार आणि डिस्टिलर्स यांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले जात आहे, असे राणे म्हणाल्या. महामंडळ शेतकऱ्यांना कीड नियंत्रण, सुधारित शेती तंत्र आणि पीक व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देत असून, केंद्र सरकारच्या योजनांचा लाभ गोव्यातील शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्नशील आहे. यासाठी आम्ही फलोत्पादन महामंडळामार्फत केंद्र सरकारकडे मदतीसाठी पत्रव्यवहार केला आहे, असेही राणे यांनी सांगितले.

काजू महोत्सवाच्या तिसऱ्या आवृत्तीद्वारे गोव्यातील पारंपरिक पेय फेणी'च्या प्रचाराला चालना मिळत आहे. फेणीला भौगोलिक निर्देशांक (जीआय टॅग) मिळाल्यानंतर या पेयाच्या निर्यातीसाठी नव्या बाजारपेठा खुल्या झाल्या आहेत. कधीकाळी गरिबांचे पेय मानले जाणारे फेणी आता गुरुदत्त भक्ता यांच्यासारख्या उत्पादकांकडून परदेशात निर्यात होत आहे. तसेच, काजगर सारख्या डिस्टिलरीजना आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळत आहे, असे राणे म्हणाल्या.

महामंडळाच्या या उपक्रमाचा उद्देश केवळ काजू उद्योगाला चालना देणे नसून, गोव्याच्या पारंपरिक मद्यसंस्कृतीचा जागतिक स्तरावर प्रचार करणे हाही आहे. या महोत्सवात फक्त काजूवर आधारित पेये सादर केली जातील. इतर कोणत्याही प्रकारच्या मद्यांना परवानगी दिली जाणार नाही. हे महोत्सव आपली ओळख टिकवून ठेवण्यासाठी आणि ती अधिक व्यापक करण्यासाठीचे एक महत्त्वाचे पाऊल आहे, असे राणे यांनी नमूद केले.


# मडगाव नगरपरिषद अतिक्रमणविरोधी मोहिम राबवणार

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. २१** : दीर्घ प्रतीक्षेनंतर मडगाव नगरपरिषद (एमएमसी) आता अखेर आपल्या मालकीच्या मालमत्तांवरील अतिक्रमण हटवण्यासाठी निर्णायक कारवाईच्या तयारीत आहे. उच्च न्यायालयाच्या स्पष्ट निर्देशानंतर ही प्रक्रिया सुरू करण्यात येत असून, सासष्टी तालुक्यात पसरलेल्या परिषदेच्या जमिनी पुन्हा ताब्यात घेण्यासाठी ही महत्त्वपूर्ण मोहीम राबवली जाणार आहे.

एमएमसीचे अध्यक्ष दामोदर शिरोडकर यांनी यास दुजोरा देताना सांगितले की, अतिक्रमित मालमत्तांची ओळख पटवली गेली असून, त्यासंबंधीचा सविस्तर अहवाल लवकरच उच्च न्यायालयात सादर केला जाईल. या अहवालामध्ये सद्यस्थितीचे विश्लेषण आणि प्रस्तावित उपाययोजना यांचा समावेश असेल.

आम्ही मालमत्तांची यादी तयार केली असून अतिक्रमण करणाऱ्या व्यक्तींचीही ओळख पटली आहे. न्यायालयाच्या आदेशानुसारच आम्ही पुढील पावले उचलणार आहोत, असे शिरोडकर यांनी स्पष्ट केले. हा अतिक्रमणाचा मुद्दा नविन नाही. २०२२ मध्ये तत्कालीन




### उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर हालचालींना वेग

मुख्याधिकारी रोहित कदम यांनी एमएमसीला देण्यात आलेल्या किंवा भेट स्वरूपात प्राप्त झालेल्या मालमत्तांचे दस्तऐवजीकरण आणि मूल्यांकन करण्याचे निर्देश दिले होते. मात्र, त्या वेळेपासून कोणतीही ठोस कारवाई न झाल्यामुळे जमिनी बेकायदेशीररीत्या हस्तगत होण्याचे प्रमाण वाढल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे.

कुडतरी, बाणावली, मडगाव आणि फातोर्डा या भागांतील भूखंडांवर अतिक्रमणाचे प्रकार वाढल्याने नागरीक आणि नगरसेवकांनी वेळोवेळी याबाबत चिंता व्यक्त केली होती. विशेषतः अशा सुमारे ५० मालमत्ता आहेत, ज्या पूर्णपणे किंवा अंशतः परिषदेच्या मालकीच्या असून देखरेखीअभावी त्या असुरक्षित राहिल्या आहेत.या संदर्भात नगरसेवक महेश आमोणकर यांनी त्यांच्या प्रभागातील एका मालमत्तेचा व्यवसायिक हेतूने खाजगी संस्थेद्वारे गैरवापर होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला होता.

खाजगी पक्ष परिषदेच्या जमिनीचा गैरवापर करत आहेत. यापूर्वीही यावर कारवाईचा प्रयत्न झाला, परंतु काहीही ठोस घडलेले नाही,असे आमोणकर यांनी सांगितले. नगरपरिषदेची उदासीनता आणि अतिक्रमण रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा अभाव हे देखील आमोणकरांनी अधोरेखित केले.

या पार्श्वभूमीवर अध्यक्ष शिरोडकर यांनी स्पष्ट केले की, महापालिका आता या संपूर्ण प्रकरणाकडे गांभीर्याने पाहत असून मालमत्तेचे पुनर्प्राप्ती आणि संरक्षण हे तिचे प्राधान्य आहे.या मालमत्तांपैकी काही प्रचंड महत्त्वाच्या आहेत आणि त्यांचे अतिक्रमण रोखणे हे अत्यावश्यक आहे. यासाठी आम्ही कोणतीही ढिलाई न करता कायदेशीर कारवाई करू, असे शिरोडकर यांनी ठामपणे सांगितले. उच्च न्यायालयाच्या सूचनांनी या मोहिमेला गती मिळालेली असून, येत्या आठवड्यांत तपासणी आणि संरक्षणात्मक उपायांची अंमलबजावणी सुरू होण्याची शक्यता आहे. सार्वजनिक मालमत्तांच्या रक्षणासाठी संघर्ष करणारे नागरिक आणि सामाजिक कार्यकर्ते यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

# गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चरला १० हजार रुपयांचा दंड

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. २१** : माहिती अधिकार कायद्यानुसार माहिती देण्यास झालेल्या विलंबाबद्दल गोवा राज्य माहिती आयोगाने गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चरवर १०,हजार रुपयांचा दंड ठोठावला आहे. आयोगाचे मुख्य माहिती आयुक्त अरविंद कुमार एच. नायर यांनी हा आदेश जारी केला.

या प्रकरणात रॉय सी. डिसोझा यांनी १५ जानेवारी २०२१ रोजी माहिती अधिकार कायद्यांतर्गत माहितीची मागणी केली होती. मात्र, संबंधित महाविद्यालयाने माहिती पुरवण्यास विलंब केला. जरी अर्जदाराने भरपाईची मागणी केली नव्हती, तरी त्यांना झालेला वेळ, श्रम आणि संसाधनांचा खर्च लक्षात घेता आयोगाने माहिती अधिकार कायद्याच्या कलम १९(८)(ब) अन्वये संबंधित सार्वजनिक प्राधिकरणाला (गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चर) १०,हजार रुपयांची भरपाई देण्याचे निर्देश दिले आहेत.

प्राचार्य डॉ. लिओन ए. मोरेनास यांना ही भरपाई रक्कम ३० एप्रिल २०२५ पर्यंत जमा करून आयोगाकडे अनुपालन अहवाल सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. यासोबतच, आयोगाने महाविद्यालयाला वर्ष २००२–०३ आणि २०१० ते २०१८ दरम्यानची संबंधित माहिती आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपीलकर्त्याला सादर करण्याचे निर्देशही दिले आहेत.

प्राचार्यांकडे असलेल्या काही फायली वगळता उर्वरित सर्व फायलींचे कॅटलॉगिंग सुरू आहे. त्यामुळे सध्याचे माहिती अधिकारी यांनी प्राचार्यांकडून आवश्यक कागदपत्रे प्राप्त करून कॅटलॉगिंगची प्रक्रिया पूर्ण करावी. तसेच, गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चरच्या सर्व कागदपत्रांचे संपूर्ण कॅटलॉगिंग आणि अनुक्रमणिका करण्याची जबाबदारी सध्याचे पीआयओ तसेच संस्थेचे प्रमुख म्हणून प्राचार्य यांच्यावर आहे, असे आयुक्त नायर यांनी स्पष्ट केले.

सध्याच्या पीआयओला ८ मे २०२५ पर्यंत या निर्देशांचे पालन करून अनुपालन अहवाल आयोगाकडे सादर करण्यास सांगण्यात आले आहे. दरम्यान, गोवा कॉलेज ऑफ आर्किटेक्चरवर आयोगाने दंड ठोठावलेली ही दुसरी वेळ आहे. डिसेंबर २०२४ मध्ये, आरटीआय अंतर्गत माहिती न दिल्याबद्दल आयोगाने संस्थेच्या माजी प्राचार्यांवर २५, हजार रुपयांचा दंड आकारला होता. गोवा सरकारी कर्मचारी संघटनेचे माजी अध्यक्ष जॉन नाझरेथ यांनी दाखल केलेल्या अपीलवरही माजी प्राचार्यांनी प्रतिसाद दिला नव्हता, त्यामुळे त्या प्रकरणातही कारवाई करण्यात आली होती.